आजचे पंचांग
शनिवार, दि. २८ मार्च २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर,
युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम
संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण,
वसंत ऋतु, चैत्र मास, शुक्लपक्ष,
दशमी सकाळी ८-४६ पर्यंत,
दिवस नक्षत्र- पुष्य दुपारी २-५० पर्यंत,
चंद्र रास- कर्क, सूर्य रास = मीन,
गुरु रास= मिथुन

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

## शिक्षक भरतीचा निकाल फिरला!

**पुणे:** राज्यात सन २०२२ मध्ये झालेल्या शिक्षक भरतीच्या सर्व निवड याद्या नव्याने जाहीर करा, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या निर्णयामुळे शिक्षक पात्रता परीक्षेत ५५ टक्के गुण मिळवून पात्र ठरलेल्या मागासवर्गीय उमेदवारांना मेरिटच्या आधारे सर्वसाधारण प्रवर्गातील जागांवर संधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शिक्षक पात्रता परीक्षेत ५५ टक्के गुण असणाऱ्या मागासवर्गीय उमेदवारांना खुल्या गटाच्या मेरिटमध्ये जाण्यास मज्जाव करण्यात आला होता.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शनिवार, दि. २८ मार्च, २०२६ | वर्ष - १ | अंक - १८२ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### उत्तर प्रदेशात श्रीरामनवमी उत्साहात

**मथुरा/वाराणसी :** शुक्रवारी संपूर्ण उत्तर प्रदेशात रामनवमी मोठ्या थाटामाटात साजरी करण्यात आली. यादरम्यान मंदिरांमध्ये विशेष विधी पार पडले. वाराणसीमध्ये मुस्लिम महिलांच्या एका गटाने प्रभू रामाच्या आरतीत सहभागी होऊन जागतिक शांततेचा संदेश दिला. विशाल भारत संस्थान आणि मुस्लिम महिला फेडरेशन यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या या कार्यक्रमात हिंदू आणि मुस्लिम दोन्ही महिलांचा सहभाग होता.

### तुंगभद्रा नदीत चार जण बुडाले

**कुर्नूल (आंध्र प्रदेश) :** कुर्नूल जिल्ह्यातील कोसिगी येथील तुंगभद्रा नदीत शुक्रवारी दोन महिलांसह चार जण बुडून मरण पावले, अशी माहिती एका पोलीस अधिकाऱ्याने दिली. येम्मिगनूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी एन. बरघवी यांनी सांगितले की, ते चौघे एका लग्नासाठी आले होते आणि नदीत उतरले असता बुडून मरण पावले. दोन महिलांसह चार जणांचा मृत्यू झाला. ते नदीत उतरले होते. सेल्फी काढत असताना ते एकामागून एक बुडून मरण पावले, असे संबंधितांनी सांगितले.

### गोवा विमानतळावर गांजा पकडला

**पणजी :** गोवा सीमाशुल्क विभागाने मनोहर आंतरराष्ट्रीय विमानतळावर (एमआयए) ८ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या २३.८ किलो हायड्रोपोनिक गांजासह पाच प्रवाशांना अटक केली आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी शुक्रवारी दिली. बुधवारी बँकॉक (थायलंड) आणि अबू धाबी येथून मस्कतमार्गे आलेल्या प्रवाशांना हवाई गुप्तचर पथकाने (एआययू) अडवले. खाद्यपदार्थांच्या पाकिटांमध्ये लपवलेला २३.८ किलो अवैध माल जप्त करण्यात आला.

---

### महाराष्ट्रातून २०३० पर्यंत वीजदर टप्प्याटप्प्याने कमी होणार

# राज्यातील वीज ग्राहकांना मोठा दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** राज्यातील वीज ग्राहकांसाठी दिलासादायक निर्णय घेत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांनी महावितरणच्या २०२५-२६ ते २०२९-३० या पाच वर्षांच्या बहुवार्षिक वीजदर याचिकेवर अंतिम आदेश जाहीर केला आहे. या आदेशानुसार घरगुती, औद्योगिक, वाणिज्यिक अशा सर्व प्रवर्गातील वीजदर २०३० पर्यंत टप्प्याटप्प्याने कमी होणार असून कोणत्याही प्रवर्गात वीजदर वाढणार नाहीत.

महावितरणच्या बहुवार्षिक वीजदर याचिकेवर आयोगाने यापूर्वी आदेश दिला होता. मात्र त्या आदेशाला स्थगिती देण्यात आली होती. त्यानंतर महावितरणने पुनर्विचार याचिका दाखल केली होती. जून २०२५ मध्ये आयोगाने त्यावर आदेश दिला होता, परंतु काही याचिकाकर्त्यांनी या आदेशाला मुंबई उच्च न्यायालय येथे आव्हान दिले. उच्च न्यायालयाने नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वावर जूनमधील आदेश रद्द केला होता. त्यानंतर सर्वोच्च न्यायालय यांनीही नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन करून नव्याने आदेश देण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार आयोगाने जनसुनावणी घेऊन व सर्व तांत्रिक बाबी पूर्ण करून हा अंतिम आदेश दिला आहे.

या आदेशानुसार १ एप्रिल २०२६ पासून बहुवार्षिक आदेशाचे दुसरे वर्ष सुरू होत असून वीज ग्राहकांना यापूर्वीच्या दरापेक्षा अधिक सवलत मिळणार आहे. स्मार्ट मीटर असलेल्या घरगुती ग्राहकांना सकाळी ९ ते दुपारी ५ या कालावधीतील वीज वापरावर मिळणारी सवलत प्रति युनिट ८० पैशांवरून ८५ पैसे करण्यात आली आहे. औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांसाठी 'टाईम ऑफ डे' सवलत सुरूच राहणार आहे. या ग्राहकांना एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीत वीजदरात १५ टक्के, तर ऑक्टोबर ते मार्च या कालावधीत २५ टक्के सवलत मिळणार आहे. त्यामुळे उद्योगांना पहिल्या पाळीत स्वस्त दरात वीज उपलब्ध होणार आहे. दर कपातीच्या निर्णयानुसार, महिना १०० युनिटपर्यंत वीज वापर असलेल्या ग्राहकांसाठी सरासरी दर ७ रुपये ३१ पैशांवरून कमी होऊन ७ रुपये १० पैसे होणार आहे. या गटातील ग्राहकांसाठी पाच वर्षांत सुमारे २६ टक्के दरकपात होणार आहे. २०२५ पूर्वी हा दर ८ रुपये १४ पैसे होता.

१०० ते ३०० युनिट वापर असलेल्या ग्राहकांसाठीचा दर १३ रुपये १७ पैशांवरून कमी होऊन १२ रुपये ९४ पैसे होईल. उच्च दाब औद्योगिक ग्राहकांसाठीचा दर १० रुपये ७८ पैशांवरून कमी होऊन १० रुपये ७१ पैसे होणार आहे. हे दर पुढील प्रत्येक वर्षी १ एप्रिल रोजी टप्प्याटप्प्याने आणखी कमी होत जाणार आहेत. आयोगाने या आदेशात विद्युत वाहन चार्जिंग स्टेशनसाठी २०२६-२७ या वर्षासाठी ९ रुपये ५० पैसे प्रति युनिट दर निश्चित केला आहे. हा दर २०२८-२९ पर्यंत स्थिर राहणार आहे. त्यामुळे इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन मिळणार आहे. तसेच हाऊसिंग सोसायट्यांना त्यांच्या परिसरात इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग सुविधा सुरू करण्यास परवानगी मिळणार आहे.

घरांच्या छतावर सौरऊर्जा प्रकल्प बसविणाऱ्या घरगुती ग्राहकांना मिळणाऱ्या सवलतीही कायम ठेवण्यात आल्या असून नव्या दररचनेत त्यांचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे राज्यातील सर्वच वीज ग्राहकांना पुढील पाच वर्षांत दिलासा मिळणार असल्याचे मानले जात आहे.

---

# लॉकडाऊनच्या अफवा पसरवल्यास फौजदारी कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** अमेरिका-इस्रायल आणि इराणमध्ये सुरू असलेल्या युद्धाचा परिणाम आता जागतिक स्तरावर दिसू लागला आहे. कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूच्या किमतीत वाढ झाल्यामुळे बाजारपेठेत चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. याच पार्श्वभूमीवर मध्यपूर्वेतील तणावामुळे सोशल मीडियावर लॉकडाऊनच्या अफवा वेगाने पसरत असून, त्यामुळे लहान व्यापारी आणि बाजारपेठांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. यावर प्रतिक्रिया देताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले की, राज्यात लॉकडाऊन लावण्यात येणार नाही. तसेच अफवा पसरवणाऱ्यांवर थेट फौजदारी कारवाई करण्यात येईल, असा इशाराही दिला. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे की फेसबुक, एक्स किंवा व्हॉट्सअॅप सारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर खोटी माहिती पसरवणे हा गुन्हा आहे. अशा प्रकरणांमध्ये संबंधित व्यक्तींवर कडक फौजदारी कारवाई केली जाऊ शकते. नागरिकांनी जबाबदारीने वागावे, अप्रमाणित माहितीवर विश्वास ठेवू नये आणि ती पुढे पाठवू नये, असे आवाहन केले. दरम्यान, केंद्र सरकारने सर्वसामान्यांना दिलासा देत पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्क (एक्साइज ड्यूटी) प्रति लिटर 10 रुपयांनी कमी केले आहे. या निर्णयामुळे इंधन दरवाढीचा थेट परिणाम नागरिकांवर होणार नाही, कारण वाढीव खर्च तेल कंपन्या आणि केंद्र सरकार उचलणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निर्णयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आणि पुढे म्हणाले की, पाकिस्तान, श्रीलंका आणि बांग्लादेश यांसारख्या देशांमध्ये इंधन टंचाईमुळे अनेक ठिकाणी जवळपास ठप्प परिस्थिती निर्माण झाली आहे, तर भारतात परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आहे.

---

# मंत्री नरहरी झिरवळ यांच्यावर होणार कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांचे काही व्हिडिओ बाहेर आले असून, त्याची सत्यता पडताळणे आवश्यक आहे. आता जे काही व्हिडिओ बाहेर आले आहेत ते गंभीर आहेत. ते व्हिडिओ खरे असतील तर त्यांच्यावर योग्य ती कारवाई होईलच, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. मंत्री नरहरी झिरवळ यांचा अश्लील व्हिडिओ व्हायरल झाल्याने नवा वाद निर्माण झाला आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री म्हणाले की, जे व्हिडिओ बाहेर आले त्यांची सत्यता पडताळणे आवश्यक आहे. यासंदर्भात मंत्री झिरवळ यांनी आपल्याशी दूरध्वनीवरून संपर्क केला असून, व्हायरल झालेला व्हिडिओ हा तीन-चार व्हिडिओ एकत्र जोडून चुकीच्या पद्धतीने तयार करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच त्याची चौकशी व्हावी असेही ते म्हणाले. त्यावर, त्यांनी यासंदर्भात तक्रार दाखल करावी, असा सल्ला आपण त्यांना दिल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. या व्हिडिओची शहानिशा करण्यात येईल, असे सांगतानाच सध्या जी परिस्थिती समोर आली आहे. त्यानंतर या व्हिडीओची सत्यता काय आहे, ती पडताळून पाहिली जाईल. त्यानंतर, त्यांच्या पक्षाच्या नेत्या सुनेत्रा पवार आणि आम्ही मिळून योग्य निर्णय करू. मात्र, आता जे काही व्हिडिओ समोर आले आहेत ते गंभीर आहेत.

---

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विद्यार्थ्यांचे आंदोलन

# एक्सीडेंटल कुलगुरू हटवा, विद्यापीठ वाचवा

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे कुलगुरूंना पदावरून हटवण्याच्या मागणीसाठी विद्यार्थ्यांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला असून विद्यापीठ प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. "एक्सीडेंटल कुलगुरू हटवा, विद्यापीठ वाचवा" अशा घोषणाबाजी करत विद्यार्थ्यांनी आंदोलनाची भूमिका जाहीर केली.

विद्यार्थी प्रतिनिधींनी केलेल्या आरोपांनुसार, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) अंतर्गत विद्यापीठाला मिळालेला सुमारे ६२ कोटी रुपयांचा निधी अद्याप खर्च न करता ठेवण्यात आला आहे. तसेच जवळपास ५ लाख विद्यार्थ्यांचे निकाल ९० दिवसांहून अधिक काळ प्रलंबित असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे.

याशिवाय पीएचडी संदर्भातील समित्या वर्षभरापासून गठित न करणे, प्राध्यापक भरती प्रक्रियेत होत असलेला विलंब, तसेच परीक्षा संचालक आणि अधिष्ठाता यांसारखी महत्त्वाची पदे प्रभारी तत्त्वावर ठेवण्यात आल्याबाबतही विद्यार्थ्यांनी नाराजी व्यक्त केली. कुलसचिव नियुक्तीच्या गोपनीय अहवाल लीकप्रकरणी दोषींवर कारवाई करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी "कमवा व शिका" योजनेतील मानधन वाढवावे तसेच प्लेसमेंट सेल अधिक प्रभावी करावा, अशीही मागणी केली आहे.

या सर्व मुद्द्यांवरून कुलगुरूंच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत त्यांना तात्काळ पदावरून हटवण्यात यावे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

दरम्यान, मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशाराही विद्यार्थ्यांनी दिला असून विद्यापीठ परिसरात आंदोलनाचे वातावरण निर्माण झाले आहे.

---

### गुंतवणूकदारांनी सावध राहण्याचा विश्लेषकांचा सल्ला

# निफ्टीत ७ ते ८ टक्के घसरणीचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** भारतीय शेअर बाजारासाठी आगामी काळ अधिक आव्हानात्मक ठरण्याची शक्यता असून गुंतवणूकदारांच्या चिंतेत भर टाकणारी माहिती समोर आली आहे. अर्थ विषयक विश्लेषकांनी इशाऱ्यानुसार, जागतिक अनिश्चितता आणि कंपन्यांच्या नफ्यातील घटत्या अंदाजामुळे निफ्टी ५० निर्देशांकात आगामी काळात ७ ते ८ टक्क्यांची घसरण होऊ शकते.

विश्लेषकांच्या मते, वित्त वर्ष २०२७ साठी बाजाराने पूर्वी १३ ते १५ टक्के उत्पन्न वाढीचा अंदाज वर्तवला होता. मात्र बदललेल्या परिस्थितीत हा अंदाज आता ६ ते ७ टक्क्यांपर्यंत खाली येण्याची शक्यता आहे. वाढती महागाई, कच्च्या तेलाच्या किमतीतील उसळी आणि जागतिक स्तरावरील भू-राजकीय तणाव यामुळे कंपन्यांच्या नफ्यावर दबाव वाढला असून उत्पन्नाचे अंदाज सातत्याने कमी केले जात आहेत.

मिडकॅप आणि स्मॉलकॅप समभागांमध्ये अधिक जोखीम आहे. निफ्टीमध्ये ७ ते ८ टक्क्यांची घसरण अपेक्षित असली तरी मिडकॅप आणि स्मॉलकॅप समभागांमध्ये सुमारे १० टक्क्यांपर्यंत घसरण होऊ शकते. असाही विश्लेषकांचा अंदाज आहे. परिस्थिती बिकट झाल्यास बाजार 'शून्य उत्पन्न वाढ' गृहित धरून व्यवहार करू लागेल आणि त्यामुळे व्हॅल्यूएशनवर दबाव येऊ शकतो. मार्च तिमाहीत मोठा परिणाम दिसणार नाही. मात्र जून तिमाहीपासून त्याचे स्पष्ट परिणाम दिसू लागतील. ऊर्जेच्या किमती उच्च स्तरावर राहिल्यास परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते. या आर्थिक परिस्थितीचा पूर्ण परिणाम २०२६ च्या उत्तरार्धात अधिक स्पष्टपणे दिसेल, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला. गेल्या ३ ते ६ महिन्यांत आयटी क्षेत्रात मोठी घसरण झाली असल्याने या क्षेत्रातील समभागांचे मूल्यांकन आकर्षक पातळीवर आले आहे. हे क्षेत्र पुन्हा आपल्या सरासरी पातळीवर परतण्याची शक्यता असल्याचे विश्लेषकांनी म्हटले आहे.

कच्च्या तेलातील चढ-उतार, पश्चिम आशियातील तणाव आणि परदेशी गुंतवणूकदारांची सातत्याने सुरू असलेली विक्री यामुळे सध्या बाजारात मोठी अस्थिरता आहे. अशा परिस्थितीत गुंतवणूकदारांनी घाईघाईने निर्णय घेऊ नयेत. टप्प्याटप्प्याने गुंतवणूक करणे आणि बाजारातील घसरणीचा दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी वापर करणे फायदेशीर ठरेल, असा सल्लाही त्यांनी दिला.

---

### उत्पादन शुल्कातील कपातीचे स्वागत

**अमरावती :** आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी शुक्रवारी पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्क कमी करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाचे स्वागत केले आणि या निर्णयाला एक खंबीर जनहितार्थ पाऊल म्हटले. सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्क प्रति लिटर १० रुपयांनी कमी केले, ज्यामुळे वाढत्या जागतिक तेल किमतींमुळे आवश्यक झालेली किरकोळ दरवाढ टळली. मुख्यमंत्री म्हणाले की, या निर्णयामुळे सर्वसामान्य माणसाला अस्थिरतेपासून संरक्षण मिळण्यास मदत होईल. तसेच, पंतप्रधान नरेंद्र मोदी अर्थव्यवस्थेला स्थिरता देत आहेत, असेही ते म्हणाले.

---

# दोन लाखांची लाच घेताना उपविभागीय अधिकारी रंगेहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** जुन्नर-आंबेगाव उपविभागाचे उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी गोविंद पंढरीनाथ शिंदे (वय ४६) यांना दोन लाख रुपयांची लाच स्वीकारताना अँटी करप्शन ब्युरो, पुणे पथकाने शुक्रवारी (दि. २७ मार्च) रंगेहात पकडले. या कारवाईमुळे महसूल विभागात मोठी खळबळ उडाली आहे.

तक्रारदार (वय ४८) हे बांधकाम व्यावसायिक असून एका भागीदारी फर्मचे भागीदार आहेत. संबंधित फर्मने पुणे-नाशिक महामार्गालगत नारायणगाव येथे संयुक्त उपक्रमातून इमारतीचे बांधकाम सुरू केले होते. सुमारे ९० टक्के काम पूर्ण झाल्यानंतर अंशतः पूर्णत्व प्रमाणपत्र मिळविण्यासाठी तक्रारदाराने उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केला होता. हा प्रस्ताव नगररचना विभागाकडे पाठवून आवश्यक 'ना हरकत प्रमाणपत्र' मिळाल्यानंतरही प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात आला होता. दि. २० मार्च रोजी तक्रारदार चौकशीसाठी गेले असता आरोपी शिंदे यांनी प्रमाणपत्र मंजूर करण्यासाठी ५ लाख रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. याबाबत तक्रारदाराने दि. २४ मार्च रोजी अँटी करप्शन ब्युरो, पुणे येथे तक्रार दिली. त्यानुसार दि. २७ मार्च रोजी पडताळणी कारवाई करण्यात आली. यात आरोपी शिंदे यांनी दोन लाख रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. पडताळणीनंतर मंचर येथील उपविभागीय कार्यालयात सापळा रचण्यात आला. या प्रकरणी मंचर पोलीस ठाणे येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमांतर्गत गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक शिरीष देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक अजीत पाटील व अर्जुन भोसले यांच्या नेतृत्वाखाली पार पडली.

---

### हवाई दल-लष्कराला मिळणार मोठी बळकटी

# २.३८ लाख कोटींच्या संरक्षण खरेदीला हिरवा कंदील

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** देशाची संरक्षण क्षमता अधिक भक्कम करण्याच्या दृष्टीने संरक्षण मंत्रालय यांनी २.३८ लाख कोटी रुपयांच्या भव्य भांडवली खरेदी प्रस्तावांना मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे भारतीय हवाई दल आणि लष्कराच्या आधुनिकीकरणाला मोठा वेग मिळणार असून स्वदेशी उत्पादनालाही चालना मिळणार आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संरक्षण खरेदी परिषद (डीएसी) बैठकीत या सर्व प्रस्तावांना 'आवश्यकतेची स्वीकृती' देण्यात आली. खरेदी प्रक्रियेतील हा पहिला आणि महत्त्वाचा टप्पा असून पुढील निविदा व करार प्रक्रियेस यानंतर सुरुवात होणार आहे.

या पॅकेजमधील सर्वात मोठा घटक म्हणजे सुमारे १ लाख कोटी रुपयांचा ६० मध्यम वाहतूक विमानांचा प्रकल्प. सध्या वापरात असलेली जुनी एएन-३२ विमाने टप्प्याटप्प्याने बाद करून त्याऐवजी आधुनिक विमानांचा समावेश केला जाणार आहे. बाय अँड मेक धोरणानुसार १२ विमाने थेट खरेदी केली जातील, तर उर्वरित ४८ विमाने भारतातच तयार केली जाणार आहेत. त्यामुळे देशांतर्गत संरक्षण उद्योगाला मोठी चालना मिळेल. रशियन बनावटीच्या एस-४०० या अत्याधुनिक हवाई संरक्षण प्रणालीचे आणखी पाच स्क्वॉड्रन खरेदी करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. सुमारे ५० हजार कोटी रुपयांचा हा प्रकल्प देशाच्या हवाई सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या प्रणालीमुळे शत्रूची लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रे, लढाऊ विमाने आणि ड्रोन यांचा अचूक वेध घेऊन त्यांचा नाश करणे शक्य होते. हवाई दलासाठी चार स्क्वॉड्रन दूरस्थपणे नियंत्रित लढाऊ विमानांची (आरपीएसए) खरेदी केली जाणार आहे. सुमारे ४५ हजार कोटी रुपयांच्या या प्रकल्पामुळे मानवरहित तंत्रज्ञानाचा वापर वाढणार असून, वैमानिकांना धोका न पत्करता अचूक हल्ले आणि दीर्घकाळ निगराणी शक्य होणार आहे. भारतीय लष्करासाठी सुमारे २,५०० कोटी रुपयांच्या ३०० धनुष तोफ तोफांना मंजुरी देण्यात आली आहे. बोफोर्स डिझाइनवर आधारित या तोफा ३८ किमीपर्यंत मारा करू शकतात आणि सर्व हवामानात कार्यरत राहतात. याशिवाय चिलखत भेदी दारुगोळा, अत्याधुनिक रेडिओ रिले प्रणाली, हवाई संरक्षण नेटवर्क, तसेच धावपट्टीशिवाय उड्डाण करणारे ड्रोन यांचाही समावेश या पॅकेजमध्ये करण्यात आला आहे. या सर्व खरेदीत 'मेक इन इंडिया'ला प्राधान्य देण्यात आले आहे. देशांतर्गत उद्योगांच्या सहभागामुळे रोजगारनिर्मिती वाढण्यासोबतच संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरतेकडे मोठे पाऊल उचलले जात आहे. जागतिक स्तरावर वाढत असलेल्या भू-राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताने संरक्षण क्षमता मजबूत करण्यासाठी घेतलेला हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. या खरेदीमुळे तिन्ही दलांची सज्जता वाढून भविष्यातील कोणत्याही आव्हानाला सामोरे जाण्यास भारत अधिक सक्षम होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

---

# लाडक्या बहिणींना फेब्रुवारी हप्ता जमा होण्यास सुरुवात



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'लाडकी बहीण' योजनेअंतर्गत फेब्रुवारी महिन्याचा हप्ता महिलांच्या खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

आदिती तटकरे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करून ही माहिती दिली. पात्र महिलांच्या बँक खात्यात टप्प्याटप्प्याने रक्कम जमा होत असून लाभार्थ्यांनी आपल्या खात्याची पडताळणी करावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.

राज्य सरकारच्या या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा आर्थिक मदत दिली जाते. या योजनेचा लाभ राज्यातील मोठ्या संख्येने महिलांना होत आहे. फेब्रुवारी महिन्याचा हप्ता जमा होण्यास सुरुवात झाल्याने लाभार्थी महिलांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. सरकारकडून उर्वरित लाभार्थ्यांच्या खात्यातही लवकरच रक्कम जमा होईल, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## संपादकीय

### उत्पादन शुल्क, तेल आणि अर्थकारण



**पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात कपात करण्याचा निर्णय हा वरकरणी सामान्य नागरिकांना दिलासा देणारा वाटतो. पण प्रत्यक्षात हा निर्णय अर्थकारण, महागाई, सरकारी महसूल आणि तेल कंपन्यांच्या नफ्याशी जोडलेला गुंतागुंतीचा विषय आहे. .**

जागतिक बाजारात कच्च्या तेलाचे दर वाढले की भारतासारख्या आयातनिरपेक्ष देशांसमोर मोठे आव्हान उभे राहते. कारण भारत आपल्या गरजेच्या बहुतांश तेलासाठी आयातीवर अवलंबून आहे. तेल दर वाढले की महागाई वाढते, वाहतूक खर्च वाढतो, शेतीचा खर्च वाढतो आणि उद्योगांचा खर्चही वाढतो. त्यामुळे सरकारला तेल दर पूर्णपणे बाजारावर सोडणे नेहमीच शक्य होत नाही. केंद्र सरकारने पेट्रोलवरील उत्पादन शुल्क मोठ्या प्रमाणात कमी केले आणि डिझेलवरील अतिरिक्त उत्पादन शुल्क जवळपास रद्द केले. या निर्णयामागे मुख्य कारण म्हणजे जागतिक तेल दरातील वाढ आणि त्याचा देशांतर्गत महागाईवर होणारा परिणाम. तेल दर वाढले तरी ग्राहकांवर त्याचा पूर्ण भार पडू नये, यासाठी सरकारने कर कमी करून तो भार स्वतःवर घेतला, असे अधिकृत स्पष्टीकरण देण्यात आले. उत्पादन शुल्क हा केंद्र सरकारच्या महसुलाचा मोठा स्रोत आहे. पेट्रोल आणि डिझेलवरील करातून सरकारला मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळते. त्यामुळे उत्पादन शुल्कात कपात म्हणजे सरकारच्या महसुलात मोठी घट. एका अंदाजानुसार उत्पादन शुल्कात प्रति लिटर एक रुपयाची कपात केली तर सरकारला दरवर्षी हजारो कोटी रुपयांचा महसूल कमी होतो. म्हणजेच येथे सरकारसमोर नेहमी दोन पर्याय असतात. एक म्हणजे इंधन दर वाढू देणे आणि महागाई वाढण्याचा धोका पत्करणे. दुसरा पर्याय म्हणजे कर कमी करून महसुलात घट स्वीकारणे. बहुतांश वेळा सरकार दुसरा पर्याय निवडते कारण इंधन दरवाढ ही राजकीयदृष्ट्या अत्यंत संवेदनशील बाब असते. पण या निर्णयाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे तेल कंपन्या. भारतात पेट्रोल आणि डिझेलचे दर पूर्णपणे बाजारावर अवलंबून असले तरी प्रत्यक्षात सरकार आणि तेल कंपन्यांमध्ये एक प्रकारचा समतोल राखला जातो. जागतिक तेल दर वाढले तरी अनेकदा कंपन्या लगेच दर वाढवत नाहीत. अशा वेळी त्यांचा तोटा वाढतो. उत्पादन शुल्कात कपात केली की कंपन्यांना दर न वाढवता तोटा कमी करता येतो. यातून एक महत्त्वाचा मुद्दा समोर येतो. पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती या पूर्णपणे बाजारावर अवलंबून नाहीत, तसेच पूर्णपणे सरकार ठरवत नाही. त्या सरकार, तेल कंपन्या आणि जागतिक बाजार या तिन्ही घटकांच्या परस्पर संबंधांवर ठरतात. म्हणजेच इंधन दर हा अर्थकारण, राजकारण आणि उद्योग या तिन्हींचा संगम आहे. या निर्णयाचा परिणाम महागाईवरही होतो. इंधन दर कमी राहिले तर वाहतूक खर्च कमी राहतो आणि त्यामुळे अन्नधान्य, भाजीपाला, बांधकाम, उद्योग या सर्व क्षेत्रांतील खर्चावर नियंत्रण राहते. म्हणूनच अनेक अर्थतज्ज्ञ इंधन दर हा महागाईतील सर्वात महत्त्वाचा घटक मानतात. सरकारचा महसूल कमी झाला की सरकारला कर्ज घ्यावे लागते किंवा इतर कर वाढवावे लागतात किंवा खर्च कमी करावा लागतो. म्हणजेच इंधन कर कमी करण्याचा फायदा तात्काळ दिसतो; पण त्याची किंमत अर्थव्यवस्थेला दुसऱ्या मार्गाने द्यावी लागते. या सगळ्या प्रश्नातून एक मोठा आर्थिक वास्तव समोर येते आणि ते म्हणजे भारताची ऊर्जा अवलंबित्व. भारत तेल आयातीवर अवलंबून असेपर्यंत पेट्रोल आणि डिझेलचे दर, कर आणि महागाई यांचे राजकारण सुरूच राहणार. त्यामुळे इंधन कर हा केवळ कराचा प्रश्न नसून ऊर्जा धोरणाचा प्रश्न आहे. सौर ऊर्जा, विद्युत वाहने, सार्वजनिक वाहतूक, जैवइंधन, ऊर्जा कार्यक्षमता या गोष्टी वाढल्या तर तेलावरील अवलंबित्व कमी होईल आणि इंधन दराचा अर्थव्यवस्थेवर होणारा परिणामही कमी होईल. पण हा बदल हळूहळू होणार आहे. तोपर्यंत पेट्रोल आणि डिझेलवरील कर हा सरकारसाठी महसुलाचा सर्वात सोपा स्रोत आणि राजकारणातील सर्वात संवेदनशील विषय राहणार आहे. तेल स्वस्त झाले की सरकार कर वाढवते; तेल महाग झाले की सरकार कर कमी करते. म्हणजेच इंधन कर धोरण हे अर्थशास्त्रापेक्षा परिस्थितीनुसार बदलणारे राजकारण अधिक आहे. शेवटी पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींचा प्रश्न हा फक्त इंधनाचा प्रश्न नाही. तो महागाई, सरकारी महसूल, उद्योग, राजकारण आणि ऊर्जा सुरक्षितता या सर्व गोष्टींशी जोडलेला आहे. त्यामुळे उत्पादन शुल्कातील कपात ही केवळ दिलासा नसून ती अर्थकारणातील समतोल साधण्याचा प्रयत्न असतो. भारतात इंधन दर कधीच पूर्णपणे बाजाराचे नसतात आणि कधीच पूर्णपणे सरकारचेही नसतात. ते नेहमीच या दोघांमधील समन्वयाचे परिणाम असतात.

# सोशल मिडियाचे व्यसन, तंत्रज्ञान, जबाबदारी



**» सोशल मीडियाने संवाद, मनोरंजन आणि माहिती यांचे जग बदलले. पण या बदलासोबत एक नवा प्रश्न निर्माण झाला. तंत्रज्ञान कंपन्या मानवी मानसशास्त्राचा वापर करून व्यसन तयार करतात, असा नवा आरोप होत आहे.**

अमेरिकेतील एका न्यायालयाने नुकताच दिलेला निकाल तंत्रज्ञान उद्योगासाठी महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. या निकालात सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचे डिझाइनच व्यसन निर्माण करणारे असल्याचे मान्य करण्यात आले आणि त्यामुळे वापरकर्त्यांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम झाला असे न्यायालयाने मान्य केले. हा निर्णय तंत्रज्ञान क्षेत्रातील जबाबदारीच्या चर्चेला नवे वळण देणारा ठरू शकतो.

या खटल्यात एक महत्त्वाचा मुद्दा पुढे आला आणि तो म्हणजे प्लॅटफॉर्मवरील मजकूर नव्हे, तर प्लॅटफॉर्मचे डिझाइनच हानिकारक ठरू शकते. आतापर्यंत तंत्रज्ञान कंपन्या असा युक्तिवाद करत होत्या की त्या केवळ प्लॅटफॉर्म देतात, त्यावरील मजकुरासाठी त्या जबाबदार नाहीत. पण या खटल्यात आरोप मजकुरावर नव्हता, तर डिझाइनवर होता. अनंत स्क्रोल, ऑटो प्ले, अल्गोरिदमिक शिफारसी या गोष्टी वापरकर्त्यांना जास्त वेळ प्लॅटफॉर्मवर ठेवण्यासाठी तयार केल्या जातात आणि त्यातून व्यसनासारखी सवय तयार होते, असा युक्तिवाद करण्यात आला. हा मुद्दा नवीन नाही. अनेक तंत्रज्ञान तज्ज्ञांनी आणि माजी कर्मचारी यांनी यापूर्वीही सांगितले आहे की सोशल मीडिया प्लॅटफॉर्म मानवी मानसशास्त्राचा अभ्यास करून तयार केले जातात. नोटिफिकेशन, लाईक बटण, स्क्रोल, व्हिडिओ शिफारसी या सर्व गोष्टी वापरकर्त्याचे लक्ष जास्त वेळ टिकवून ठेवण्यासाठी तयार केल्या जातात. म्हणजेच या कंपन्यांचा खरा व्यवसाय जाहिरात नसून लक्ष विकणे हा आहे. वापरकर्त्याचा जितका जास्त वेळ प्लॅटफॉर्मवर जाईल तितका जास्त नफा.

या निर्णयाची तुलना अनेकांनी तंबाखू उद्योगावरील खटल्यांशी केली आहे. एकेकाळी तंबाखू कंपन्या धूम्रपान हानिकारक नाही असे सांगत होत्या. नंतर न्यायालयीन खटले, संशोधन आणि सार्वजनिक दबाव यामुळे त्या कंपन्यांवर नियम आले. आता सोशल मीडिया कंपन्यांबाबतही तसाच टप्पा येऊ शकतो असे अनेक तज्ज्ञ मानतात. पण या प्रकरणात एक दुसरी बाजूही आहे. जर सोशल मीडिया व्यसनासाठी कंपन्यांना जबाबदार धरले, तर व्यक्तीची जबाबदारी काय हा प्रश्न निर्माण होतो. एखादा व्यक्ती जास्त वेळ मोबाईल वापरत असेल तर त्यासाठी कंपनी जबाबदार की वापरकर्ता, हा तात्त्विक आणि कायदेशीर दोन्ही प्रकारचा प्रश्न आहे. कारण तंत्रज्ञान वापरण्याचा निर्णय शेवटी व्यक्तीचाच असतो. तथापि हा युक्तिवाद पूर्णपणे ग्राह्य धरता येत नाही. कारण आधुनिक डिजिटल प्लॅटफॉर्म हे केवळ साधे उत्पादन नाहीत. ते सतत वापरकर्त्यांचे वर्तन अभ्यासतात, डेटा गोळा करतात, अल्गोरिदम बदलतात आणि वापरकर्त्याला जास्त वेळ गुंतवून ठेवण्यासाठी स्वतःला बदलत राहतात. म्हणजेच हे स्थिर उत्पादन नसून सतत बदलणारी प्रणाली आहे. त्यामुळे त्याची तुलना साध्या उत्पादनाशी करता येत नाही.

या प्रकरणाचा सर्वात मोठा परिणाम तंत्रज्ञान डिझाइनवर होऊ शकतो. जर कंपन्यांना त्यांच्या डिझाइनसाठी जबाबदार धरले जाऊ लागले, तर त्यांना प्लॅटफॉर्मची रचना बदलावी लागेल. उदाहरणार्थ, अनंत स्क्रोलऐवजी वापर मर्यादा, ऑटो प्लेऐवजी वापरकर्त्याची परवानगी, नोटिफिकेशन कमी करणे, मुलांसाठी वेगळे डिझाइन, वेळेची सूचना अशा अनेक बदलांची शक्यता आहे. याचा अर्थ असा की भविष्यात तंत्रज्ञान डिझाइनमध्ये एक नवा विचार महत्त्वाचा ठरेल आणि तो म्हणजे जबाबदार डिझाइन. आतापर्यंत तंत्रज्ञान डिझाइनचा मुख्य उद्देश वापर वाढवणे आणि नफा वाढवणे हा होता. पण आता वापरकर्त्यांचे मानसिक आरोग्य, वेळ, गोपनीयता आणि सामाजिक परिणाम या गोष्टींचाही विचार करावा लागेल. सरकारांसाठीही हा निर्णय महत्त्वाचा आहे. कारण जगभरात सरकारे सोशल मीडिया नियमनाचा विचार करत आहेत. मुलांच्या वापरावर मर्यादा, डेटा संरक्षण, अल्गोरिदम पारदर्शकता, व्यसनकारक डिझाइनवर नियम अशा अनेक गोष्टींची चर्चा सुरू आहे. या निर्णयामुळे अशा नियमांना अधिक बळ मिळू शकते.

या सर्व चर्चेचा मुख्य मुद्दा एकच आहे. तंत्रज्ञान तटस्थ नसते. ते ज्या पद्धतीने तयार केले जाते त्याप्रमाणे समाजावर परिणाम करते. जर तंत्रज्ञानाचा उद्देश वापरकर्त्याचे लक्ष जास्तीत जास्त वेळ अडकवणे हा असेल, तर त्याचे सामाजिक परिणाम होणारच. त्यामुळे तंत्रज्ञान कंपन्या केवळ तंत्रज्ञान कंपन्या नसून त्या सामाजिक संस्था बनल्या आहेत. हा प्रश्न तंत्रज्ञानाचा नाही, तर जबाबदारीचा आहे. तंत्रज्ञान कंपन्या केवळ प्लॅटफॉर्म देतात की त्या मानवी वर्तन बदलणारी प्रणाली तयार करतात, हा प्रश्न आता न्यायालयात पोहोचला आहे.

या प्रश्नाचे उत्तर पुढील दशकातील डिजिटल जगाचे स्वरूप ठरवणार आहे. जर या निर्णयामुळे तंत्रज्ञान अधिक जबाबदार झाले, तर कदाचित हा निर्णय डिजिटल जगासाठी तितकाच महत्त्वाचा ठरेल जितका एकेकाळी तंबाखू उद्योगावरील निर्णय ठरला होता.

# पवना धरणातील साठा ४३ टक्क्यांवर

## पिंपरी-चिंचवडमध्ये पाणीटंचाईचा इशारा

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरण येथे पाणीसाठा ४३.६७ टक्क्यांवर आला असून तीव्र उन्हामुळे साठा झपाट्याने कमी होत आहे. सध्याचा साठा पुढील सुमारे १०० दिवस, म्हणजे जुलैअखेरपर्यंत पुरेल असा अंदाज महापालिकेने व्यक्त केला असून नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

मावळ तालुक्यातील पवनानगर येथील पवना धरणातून पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा केला जातो. महापालिकेकडून पवना नदीवरील रावेत येथील बंधाऱ्यातून दररोज सुमारे ५२० एमएलडी पाणी उचलले जाते. हे पाणी निगडी-प्राधिकरण सेक्टर २३ येथील जलशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया करून शहराला पिण्यायोग्य पाणी म्हणून पुरवले जाते. महापालिकेकडून गेल्या सव्वासहा वर्षांपासून शहरात दोन दिवसातून एकदा पाणीपुरवठा केला जात आहे. तसेच एमआयडीसीकडून सुमारे ३० एमएलडी पाणी घेऊन शहरातील काही भागांना पुरवठा केला जातो. आंद्रा धरण पाणी योजनेअंतर्गत निघोजे येथील इंद्रायणी नदी बंधाऱ्यातून दररोज सुमारे ८० ते ९० एमएलडी पाणी उचलून चिलखी जलशुद्धीकरण केंद्रातून त्या परिसरात पाणीपुरवठा केला जात आहे.

तीव्र उन्हामुळे पाण्याची मागणी वाढल्याने धरणातील पाणीसाठा वेगाने कमी होत आहे. धरणातून पिंपरी-चिंचवड शहरासह एमआयडीसी, काही नगरपालिका आणि ग्रामपंचायतींनाही पाणी दिले जाते. जून महिन्यापर्यंत पाऊस झाल्यास शहराला मोठ्या पाणीटंचाईचा सामना करावा लागणार नाही. मात्र पाऊस उशिरा झाल्यास शहरात पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. महापालिकेकडून संपूर्ण शहरात दिवसाआड समन्यायिक पद्धतीने पाणीपुरवठा केला जात आहे. नागरिकांनी अंगण, जिने, वाहन धुण्यासाठी पिण्याचे पाणी वापरू नये तसेच शिल्लक पाणी फेकून देऊ नये. गळती टाळण्यासाठी नादुरुस्त नळ आणि जोड तात्काळ दुरुस्त करावेत, असे आवाहन पाणीपुरवठा विभागाचे सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांनी केले आहे.

दरम्यान, पाण्याची मागणी वाढल्याने शहरातील काही भागांत कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. काही भागांत अपुरा, दूषित किंवा गढूळ पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारीही नागरिकांकडून करण्यात येत आहेत. मात्र शहरात समन्यायिक पद्धतीने पाणीपुरवठा सुरू असल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे.

# ९६ तासांत सिलिंडरचा आदेश कागदावरच...

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** घरपोच गॅस सिलिंडर ९६ तासांत देण्याचा जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश प्रत्यक्षात कागदावरच राहिल्याचे समोर आले आहे. गॅस वितरकांकडून आदेशाचे पालन होत नसल्याने नागरिकांना सिलिंडरसाठी १० ते १५ दिवस प्रतीक्षा करावी लागत आहे.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुड्डी यांनी १६ मार्च रोजी बुकिंगनंतर ९६ तासांत सिलिंडर घरपोच देणे बंधनकारक केले होते. तसेच ओटीपीद्वारेच गॅस वितरण करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या होत्या. मात्र प्रत्यक्षात या आदेशानंतरही परिस्थितीत कोणतीही सुधारणा झालेली नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

जिल्ह्यातील सुमारे ३८ लाखांहून अधिक गॅसधारकांना २००२ एजन्सीमार्फत गॅस पुरवठा केला जातो.

सिलिंडरचा खोळंबा वाढल्याने अनेक कुटुंबांपुढे स्वयंपाकाचा प्रश्न गंभीर बनला आहे. काही ठिकाणी गॅस संपल्यामुळे नागरिकांना घराबाहेर चूल पेटवून स्वयंपाक करावा लागत आहे. वाढत्या मागणीमुळे लाकूड व कोळसा विक्रेत्यांनीही दरवाढ केल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे.

गॅस टंचाईमुळे काही कुटुंबांवर उपाशी राहण्याची वेळ आल्याचेही चित्र आहे. काही भागात उपहारगृहे व सार्वजनिक खानावळी बंद असल्याने काही नागरिकांनी इलेक्ट्रिक शेगडीचा पर्याय स्वीकारला आहे. मात्र सर्वांना हा पर्याय परवडत नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

# पीएमपी बसची दयनीय अवस्था

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पिंपरी आणि पुणेकरांची जीवनवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे महानगर परिवहन महामंडळ (पीएमपीएमएल) बस सेवेबाबत प्रवाशांकडून अनेक अपेक्षा व्यक्त केल्या जात असल्या तरी प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे बससेवेची दयनीय अवस्था समोर येत आहे. गेल्या काही दिवसांत पीएमपीच्या बसगाड्यांना आग लागणे, बस रस्त्यात बंद पडणे अशा घटना वारंवार घडत असल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गेल्या काही महिन्यांत पीएमपीच्या दहापेक्षा अधिक बसगाड्यांना भररस्त्यात आग लागल्याच्या घटना घडल्या आहेत. बसगाड्यांच्या देखभाल व दुरुस्तीकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचे या घटनांवरून दिसून येत आहे. त्यामुळे प्रवासादरम्यान प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

पीएमपीच्या ताफ्यात खिळखिळ्या झालेल्या बसगाड्यांची संख्या मोठी असल्याचे सांगितले जात आहे. अनेक बस रस्त्यावर धावताना अचानक बंद पडतात. त्यामुळे प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागतो.

जुन्या बसगाड्यांची योग्य देखभाल आणि दुरुस्ती होत नसल्याचे वारंवार घडणाऱ्या घटनांवरून स्पष्ट होत आहे. पीएमपी बसच्या देखभालीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या घटनांना आळा घालण्यासाठी पीएमपी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

# लोणावळा नगर परिषदेत वाद चिघळला

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**लोणावळा :** लोणावळा नगर परिषद येथे सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आणि मुख्याधिकारी यांच्यातील वाद चिघळल्याने त्याचा फटका आता सर्वसामान्य नागरिकांना बसू लागला आहे. मागील पाच दिवसांपासून सुरू असलेल्या या वादामुळे नगर परिषद कामकाजावर परिणाम झाला असून मुख्याधिकाऱ्यांच्या कार्यालयाला टाळे लावल्याने अनेक प्रशासकीय कामे ठप्प झाली आहेत.

नगर परिषदेमध्ये एकहाती सत्ता असतानाही सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये समन्वयाचा अभाव दिसून येत असल्याची टीका होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे लोणावळा शहराध्यक्ष नासिर शेख यांनी पत्रकार परिषद घेऊन आमदार सुनील शेळके यांनी या वादात मध्यस्थी करून प्रश्न सोडवावा, अशी मागणी केली आहे.




मुख्याधिकारी नगरसेवकांचे ऐकत नाहीत तसेच कार्यालयीन वेळेत कार्यालयात उपस्थित राहत नाहीत, असा आरोप करत नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष आणि सत्ताधारी गटाच्या नगरसेवकांनी मुख्याधिकाऱ्यांच्या कार्यालयाला टाळे लावले आहे. आंदोलनाचा पाचवा दिवस उलटूनही कोणताही तोडगा निघालेला नाही. मुख्याधिकारीही कार्यालयात हजर नसल्याने नगर परिषद कामकाजावर परिणाम होत आहे. नगरसेवक आपल्या भूमिकेवर ठाम असल्याने नागरिकांची कामे रेंगाळत आहेत. शासन आणि प्रशासन यांनी समन्वयाने काम केल्यासच शहराचा विकास होऊ शकतो. लोणावळा नगर परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेसची एकहाती सत्ता असल्याने विकासकामांना वेग येईल अशी अपेक्षा होती. सध्या सुरू असलेल्या वादामुळे विकासकामांवर परिणाम होत असल्याचे बोलले जात आहे. हा वाद लवकर मिटवून समन्वयातून कामकाज सुरू करणे हाच मार्ग असल्याचे मत व्यक्त होत आहे.

दरम्यान, मुख्याधिकारी वेळ देत नसल्यामुळे जनतेची कामे रखडली असल्याचा आरोप नगरसेवकांकडून करण्यात येत आहे. मात्र कोणती कामे प्रलंबित आहेत याबाबत स्पष्ट माहिती दिली जात नाही. मुख्याधिकाऱ्यांनी माझ्याकडे कोणतेही काम प्रलंबित नसल्याचे सांगत कामकाज सुरळीत असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे या वादात नेमके खरे कोण आणि खोटे कोण, असा प्रश्न नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे.

## आधी तज्ज्ञ समितीचा अहवाल घ्या – पिंपरी-चिंचवड पोलिसांचे आदेश

# डॉक्टरांविरोधात तक्रारींवर थेट गुन्हे दाखल नकोत

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** शहरातील रुग्णालय किंवा डॉक्टरांविरुद्ध येणाऱ्या तक्रारींवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करू नयेत, तर प्रथम वैद्यकीय तज्ज्ञ समितीचा अहवाल घ्यावा, अशा सूचना पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालय यांनी सर्व पोलिस ठाण्यांना दिल्या आहेत. इंडियन मेडिकल असोसिएशनच्या पिंपरी-चिंचवड भोसरी शाखेकडून प्राप्त झालेल्या पत्राच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. वैद्यकीय क्षेत्रातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.



अलीकडील काळात वैद्यकीय निष्काळजीपणाच्या संशयावरून काही ठिकाणी डॉक्टरांविरोधात थेट गुन्हे नोंदविणे, रुग्णालयांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण होणे, तसेच नातेवाईकांकडून आक्रमक प्रतिक्रिया उमटणे असे प्रकार वाढले असल्याचे समोर आले आहे. अनेकदा अपूर्ण माहिती, गैरसमज किंवा भावनिक तणावाच्या आधारे तक्रारी दाखल होत असल्याने त्यातून कायदेशीर गुंतागुंत निर्माण होते. परिणामी डॉक्टर, रुग्णालय कर्मचारी तसेच रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांच्या सुरक्षिततेवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती.

या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्तांच्या मान्यतेने सर्व पोलिस ठाण्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. वैद्यकीय निष्काळजीपणासंदर्भातील कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास तातडीने गुन्हा दाखल करण्याऐवजी प्रथम प्राथमिक पडताळणी करावी. त्यानंतर संबंधित विषयातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या समितीकडून अभिप्राय घेणे आवश्यक असणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार वैद्यकीय प्रकरणांमध्ये फौजदारी कारवाई करण्यापूर्वी स्वतंत्र वैद्यकीय मत घेणे आवश्यक मानले जाते. या प्रक्रियेचे पालन केल्यास निरपराध डॉक्टरांवर होणारी कारवाई टाळता येईल, तसेच दोषी आढळल्यास ठोस पुराव्यांवर आधारित कारवाई करणे शक्य होईल.

पोलिस आयुक्तालयाकडून सर्व परिमंडळ प्रभारी अधिकारी, विभागीय सहाय्यक पोलिस आयुक्त तसेच सर्व पोलिस स्टेशन प्रभारी अधिकाऱ्यांना या सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. रुग्णालय परिसरात उद्भवणाऱ्या तणावपूर्ण परिस्थिती हाताळताना संयम राखणे, संवाद साधणे आणि कायद्याच्या चौकटीत राहून कारवाई करणे यावर विशेष भर देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ समन्वय साधण्यासाठी क्षेत्रनिहाय व्हॉट्सअॅप गट तयार करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. या गटामध्ये स्थानिक पोलिस अधिकारी, रुग्णालय प्रशासन, डॉक्टर आणि संबंधित प्रतिनिधी यांचा समावेश असणार आहे. रुग्णालयांमध्ये अचानक उद्भवणाऱ्या वादग्रस्त परिस्थिती, रुग्णांच्या नातेवाईकांची गर्दी किंवा तणावपूर्ण प्रसंगाच्या वेळी या गटांच्या माध्यमातून तत्काळ संपर्क साधून परिस्थिती नियंत्रणात आणता येणार आहे. त्यामुळे संभाव्य कायदा व सुव्यवस्था बिघडण्याचे प्रकार टाळण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# मेट्रो बोगद्यांच्या सुरक्षेसाठी कठोर नियमावली

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पुणे :** भूमिगत मेट्रोमार्गांच्या सुरक्षेला धोका निर्माण झालेल्या अलीकडील घटनेनंतर पुणे महानगरपालिका प्रशासनाने कठोर भूमिका घेत मेट्रो बोगद्यांच्या वर व आसपास होणाऱ्या बांधकामांसाठी स्वतंत्र आणि सविस्तर नियमावली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी याबाबत माहिती दिली.

शहरातील पेठ भागांमध्ये पुणे मेट्रो मार्ग भूमिगत असून या भागात जुन्या वाड्यांचा पुनर्विकास आणि नवीन बांधकामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. अलीकडे शुक्रवार पेठ परिसरात बोअरवेल खोदकामादरम्यान मेट्रो बोगद्याला भगदाड पडून बोगद्यात पाण्याची गळती झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणी संबंधित घरमालक व ठेकेदाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेनंतर पालिका तसेच मेट्रो प्रशासन अधिक सतर्क झाले असून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी मेट्रो बोगद्यांच्या परिसरातील प्रत्येक बांधकामासाठी स्वतंत्र तांत्रिक परवानगी घेणे बंधनकारक करण्यात येणार आहे.

नव्या नियमावलीमध्ये सुरक्षित अंतर, कंप नियंत्रण, बांधकामाच्या तांत्रिक अटी आणि मेट्रो संरचनेवर होणाऱ्या परिणामांचा सविस्तर विचार केला जाणार असून मेट्रो प्रकल्पाची सुरक्षितता राखत पुनर्विकास कामे सुरू ठेवण्याचा प्रशासनाचा प्रयत्न असणार आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### अवैध मद्यविक्रीवर पोलिसांचा छापा

**लोणी काळभोर :** थेऊर परिसरात अवैध मद्यविक्रीवर पोलिसांनी सलग दोन दिवस धडक कारवाया करत तीन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकले. या कारवायांमध्ये गावठी हातभट्टीची दारू व ताडी जप्त करण्यात आली असून एका महिलेसह तिघांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. देविदास माणिक दराडे (वय ३७), बसवराज नरसय्या भंडारी (वय ४४) आणि सारिका बापू सकट अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी पोलीस अंमलदार प्रमोद बबन टिळेकर यांनी सरकारतर्फे लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या कारवाईदरम्यान देविदास दराडे याच्याकडून सुमारे २५ लिटर गावठी हातभट्टीची दारू व १५० रुपयांची रोख रक्कम असा एकूण २,६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

### लोणीत टपरीच्या आडून गांजाविक्री

**लोणी काळभोर :** लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या हद्दीत टपरीच्या आडून सुरू असलेल्या गांजाविक्रीचा पर्दाफाश करण्यात पोलिसांना यश आले आहे. पोलिसांनी लोणी स्टेशन (ता. हवेली) परिसरातील फोर अव्हेन्यू सोसायटीसमोरील दळवी यांच्या टपरीवर मंगळवारी (दि. २४) रात्री साडेनऊच्या सुमारास छापा टाकून २२४ ग्रॅम गांजासह एकाला अटक केली. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. अविनाश बाळासाहेब दळवी (वय २७, रा. खैरे वस्ती, लोणी स्टेशन) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. या प्रकरणी पोलीस हवालदार आण्णा दिलीप माने यांनी सरकारतर्फे लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. खैरे वस्ती परिसरात टपरीमधून अंमली पदार्थांची विक्री होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी टपरीतील कप्प्यात गांजाच्या ३९ पुड्या आढळून आल्या.

### भक्तिमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

# ओतूर परिसरात श्रीराम जन्मोत्सव साजरा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** ओतूर (ता. जुन्नर) व परिसरात श्रीराम नवमी विविध धार्मिक कार्यक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. गावठाणातील पुरातन कोयाळकर राम मंदिर, लक्ष्मी नारायण मंदिर तसेच इतर मंदिरांमध्ये दिवसभर धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

ओतूर गावठाणातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेजवळील पुरातन कोयाळकर राम मंदिर सुमारे २४० वर्षांपूर्वी स्थापित झाले असून नुकताच मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला आहे. नव्या स्वरूपात मंदिर अत्यंत प्रसन्न व देखण्या रूपात उभे राहिले आहे.

श्रीराम नवमी निमित्त पहाटे पुजारी यादव कोयाळकर यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला. त्यानंतर आरती व ग्रंथ वाचन करण्यात आले, अशी माहिती यशराज उर्फ राघव कोयाळकर यांनी दिली.



पाडवा ते अष्टमी दरम्यान दररोज सायंकाळी पाच ते सहा या वेळेत ह.भ.प. धोंडिभाऊ महाराज पानसरे यांच्या मार्गदर्शनाखाली वारकरी शाळेतील विद्यार्थ्यांचा हरिपाठ व भजन कार्यक्रम झाला. मुख्य बाजारपेठेतील लक्ष्मी नारायण मंदिरातही श्रीराम जन्म व श्रीराम नवमी उत्सव विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला.

राम नवमी निमित्त गुढीपाडवा ते दि. २६ मार्च या कालावधीत दररोज सायंकाळी सहा ते सात या वेळेत डॉ. रश्मी घोलप यांची नवविधा भक्ती कथा व नामसंकीर्तन झाले. राम नवमीच्या दिवशी सकाळी १०.३० ते १२.३० या वेळेत त्यांचे श्रीराम जन्माचे कीर्तन झाले. रात्री आठ ते दहा या वेळेत पाऊल घडीचे कीर्तनही पार पडले.

श्री कपर्दिकेश्वर मंदिराजवळील राम मंदिरात तसेच गावठाणातील इतर राम मंदिरांमध्येही विविध धार्मिक कार्यक्रमांनी राम नवमी उत्साहात साजरी करण्यात आली. श्रीराम नवमी निमित्त दि. २६ रोजी सायंकाळी साडेसहा वाजता ओतूर बसस्थानक ते श्रीराम मंदिर अशी भव्य रामलल्ला शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत शेकडो युवक व महिला सहभागी झाले होते.

शोभायात्रेत रामलल्ला रथ, श्रीराम-लक्ष्मण-सीता-हनुमान वेशभूषा, वृक्ष दिंडी, हालगी तुरा पथक, अघोरी नृत्य आदी आकर्षणे होती. तसेच विविध सामाजिक प्रबोधनपर देखावे, सांस्कृतिक नृत्य, श्रीराम पालखी आदी कार्यक्रम सादर करण्यात आले. या उत्सवाच्या निमित्ताने दि. २५ रोजी ह.भ.प. मंगेश महाराज डुंबरे यांचे प्रवचन, धर्मध्वज व गोमाता पूजन, लकी ड्रॉ व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व कार्यक्रमांना ओतूर व परिसरातील शेकडो नागरिक, महिला व भाविक उपस्थित होते.

# रामजन्मोत्सवाचा सप्ताह अवसरीत उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** अवसरी खुर्द (ता. आंबेगाव) येथे गुढीपाडवा ते रामनवमी या कालावधीत दरवर्षीप्रमाणे यंदाही रामजन्मोत्सवाचा सप्ताह मोठ्या उत्साहात पार पडला. या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सप्ताहादरम्यान सुरज रामवत यांनी रामचरित्र मानस ग्रंथाचे पारायण केले. जोगेश्वरी महिला मंडळाच्या वतीने नित्य काकडा व हरिपाठ सेवा करण्यात आली. नंदिकेश्वर पोथी मंडळाने नियमित पोथी वाचनाचा उपक्रम राबवला, तर विठ्ठल प्रासादिक भजनी मंडळाने दररोज भजन सेवा सादर केली. मृदंग वादनाची साथ कृष्णगर वाघ आणि मुकुंद वाघ यांनी दिली.

उत्सवानिमित्त मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई व फुलांची सजावट करण्यात आली होती. ह.भ.प. रोहिदास महाराज भोर यांनी श्रीराम जन्माची कीर्तन सेवा सादर केली.

जन्मोत्सवानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवासाठी मयूर परिवारासह सोमकांत खोल्लम, देवेंद्र जंगम, सुदेश खेडकर, शैलेश भालेराव, शुभम खोल्लम, शुभम बैरागी, संतोष कसाब, शांताराम भालेराव, यतीन कुलकर्णी यांनी विशेष परिश्रम घेतले.

परंपरेनुसार उत्सवाची संपूर्ण व्यवस्था श्री हरिदास रामवत व भानुदास रामवत यांच्या परिवाराने सांभाळली. दर्शनासाठी अवसरी खुर्द व परिसरातील ग्रामस्थ, विशेषतः महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. भाविकांच्या सहकार्याने हा सप्ताह सोहळा यशस्वीपणे संपन्न झाला.

# आंबेगाव पूर्व भागात मजूर टंचाई



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुका पूर्व भागात यंदा कांद्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर झाले असले तरी काढणीसाठी मजूर टंचाईची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे कांदा काढणीची कामे रखडली असून शेतकऱ्यांना मजूर मिळवण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे.

दरवर्षी मार्च महिन्यात पारगाव येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखाना येथे गाळप हंगाम सुरू असतो. त्या काळात कारखान्यावरील मजूर कांदा काढणीसाठी उपलब्ध होत असत. मात्र यावर्षी कारखान्याचा गाळप हंगाम लवकर संपल्याने हे मजूर आपापल्या गावी परतले आहेत. त्यामुळे कांदा काढणीसाठी मजूर मिळत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

मजूर उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांची काढणीची कामे रखडली आहेत. वाढत्या उन्हामुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी भर पडत आहे. मजूर शोधण्यासाठी गावोगावी जाऊन विनंती करावी लागत असल्याचे शेतकरी विठ्ठल ढोबळे आणि राजू ढोबळे यांनी सांगितले.

यंदा कांद्याचे उत्पादन चांगले झाले असले तरी वेळेत काढणी न झाल्यास कांद्याचे नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे कृषी विभागाने किंवा प्रशासनाने याकडे लक्ष देऊन मजूर उपलब्ध करून देण्याची मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

# धामणीत रामजन्मोत्सव उत्साहात साजरा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** खेड लोणी-धामणी धामणी (ता. आंबेगाव) येथील पुरातन श्रीराम मंदिरात रामनवमीनिमित्त रामजन्मोत्सव धार्मिक आणि भक्तिमय वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला. पंचक्रोशीतील भाविक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोळाव्या शतकात येथील श्रीराम मंदिरातील राम, लक्ष्मण व सीता यांच्या मूर्तींची पुनर्प्रतिष्ठापना संत तुकाराम महाराज यांच्या हस्ते झाल्याची परंपरा सांगितली जाते. त्यामुळे येथील रामजन्म सोहळ्याला वारकरी आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

पहाटे देवस्थानाचे परंपरागत पुजारी मधुकर क्षिरसागर आणि मुकुंद क्षिरसागर यांच्या हस्ते पंचामृताने श्रीराम अभिषेक करण्यात आला. त्यानंतर मूर्तींना वस्त्रालंकार घालून महाआरती करण्यात आली आणि मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले. शिरदाळे, पहाडदरा, जारकरवाडी, बढेकरमळा, चिंचबाईवाडी आदी गावांतील भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.



सकाळी दहा वाजता ह.भ.प. गणेश महाराज गलांडे आळंदीकर यांचे रामजन्माचे कीर्तन झाले. ज्ञानेश संजीवन वारकरी शिक्षण संस्था, आळंदी येथील वारकरी आणि गायनाचार्य माऊली महाराज देशमुख यांच्या उपस्थितीमुळे कीर्तनाला रंगत आली. मंदिर परिसरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती.

दुपारी बारा वाजता श्रीरामाची पंचधातूची मूर्ती पाळण्यात ठेवून रामजन्म सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी महिला भाविकांनी पाळणा गीत म्हणत रामजन्म साजरा केला. भाविकांना खिचडी व केळीचा प्रसाद देण्यात आला. कार्यक्रमानंतर कीर्तनकार आणि वारकरी भजनी मंडळाचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रांजणी-मंचर रस्त्यावर दुर्गंधीचा विळखा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील रांजणी ते मंचर या मुख्य रस्त्यावर खडकी फाटा-चांडोली बुद्रुक परिसरातील पुलाजवळ सध्या दुर्गंधीचे साम्राज्य निर्माण झाले असून प्रवाशांना नाक दाबून प्रवास करावा लागत आहे. या प्रकारामुळे स्थानिक नागरिक आणि प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या मार्गावरून दररोज शेकडो प्रवासी, विद्यार्थी, नोकरदार तसेच शेतकरी ये-जा करतात. खडकी फाटा परिसरातील रस्ता वनहद्दीतून जात असून रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात घाण टाकली जात आहे. काही ठिकाणी मेलेली जनावरे फेकली जात असल्याचेही दिसून येत आहे. रात्रीच्या वेळी अज्ञात व्यक्ती मृत कोंबड्या, पिसे आणि इतर कचरा टाकून जात असल्याने परिसरात तीव्र दुर्गंधी पसरत आहे.



उन्हाळा वाढत असल्याने कुजलेल्या कचऱ्याचा वास अधिक तीव्र होत असून प्रवासी आणि स्थानिक ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. वनविभागाने येथे कचरा टाकू नये यासाठी सूचना फलक लावले असून "ही जागा वनहद्दीत असून कचरा टाकणे दंडनीय गुन्हा आहे" असा इशाराही देण्यात आला आहे. मात्र या सूचनांकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे चित्र आहे.

यापुढे चांडोली बुद्रुक येथील घोड नदी पुलालगतही रस्त्याच्या कडेला कचरा टाकला जात असल्याने तेथेही दुर्गंधी पसरत आहे. या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

संबंधित विभागाने या ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अधिक सूचना फलक लावावेत आणि परिसराची तातडीने स्वच्छता करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# पोंदेवाडी येथे ट्रान्सफॉर्मर फोडला

**लोणी-धामणी :** पोंदेवाडी (ता. आंबेगाव) येथील पोखरकर वस्ती शेजारील महावितरण कंपनीचा ट्रान्सफॉर्मर अज्ञात चोरट्यांनी फोडून त्यातील तांब्याच्या तारा व इतर साहित्य चोरी केल्याची घटना बुधवारी (दि. २५) रात्री घडली. या घटनेमुळे पोखरकर वस्ती आणि वाळूंज वस्ती येथील सुमारे ३० ते ३५ घरे गेल्या दोन दिवसांपासून अंधारात आहेत. चोरट्यांनी डीपी स्ट्रक्चरवरून ट्रान्सफॉर्मर खाली पाडून तो फोडला आणि त्यामधील तांब्याच्या तारा व इतर साहित्य लंपास केले. या प्रकारामुळे परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला असून नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. महावितरणने तातडीने नवीन ट्रान्सफॉर्मर बसवून वीजपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी पंचायत समिती सदस्या अंकिता वाळूंज, माजी सरपंच अनिल वाळूंज, माजी उपसरपंच संदीप पोखरकर यांनी केली आहे.

# मंत्रालयात पाणीपुरवठा योजनांचा आढावा

### आमदार बाबाजी काळे यांनी मांडले पुणे जिल्ह्याचे प्रश्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** राज्यातील पाणीपुरवठा योजनांचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत जलजीवन मिशनअंतर्गत अपूर्ण कामे, निधी आणि प्रलंबित योजना याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत आमदार बाबाजी काळे यांनी पुणे जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजनांबाबत विविध प्रश्न उपस्थित करून प्रशासनाचे लक्ष वेधले.



मंत्रालयात झालेल्या या बैठकीत जलजीवन मिशनअंतर्गत अपूर्ण कामे तात्काळ पूर्ण करणे, सुधारित योजनांना मंजुरी देणे तसेच प्रलंबित निधी लवकर उपलब्ध करून देणे याबाबत चर्चा करण्यात आली. पाईपलाईन खोदकामामुळे खराब झालेल्या रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करून ते पूर्ववत करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या. तसेच महावितरणच्या उर्वरित कामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचाही मुद्दा बैठकीत उपस्थित करण्यात आला.

बैठकीस सुधीर मुनगंटीवार, प्रताप अडसड, प्रविण तायडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तसेच पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव, जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक, पुणे विभागाचे मुख्य अभियंता आणि संबंधित अधिकारी बैठकीस उपस्थित होते.

या बैठकीत आमदार बाबाजी काळे यांनी पुणे जिल्ह्यातील जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या कामांचा आढावा घेत अपूर्ण कामांमुळे नागरिकांना होत असलेल्या अडचणींबाबत प्रशासनाचे लक्ष वेधले.

अनेक गावांमध्ये कामे रखडल्यामुळे नागरिकांना पाणीपुरवठ्याच्या समस्या निर्माण होत असल्याचे त्यांनी बैठकीत स्पष्ट केले.

दरम्यान, पुणे जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजनांवर सविस्तर चर्चा करण्यासाठी लवकरच स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. जिल्ह्यातील प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

### सहा हजार कोटींच्या निधीची प्रतीक्षा

# पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ निधीअभावी रखडला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प हा पुणे जिल्ह्याच्या विकासासाठी महत्त्वाकांक्षी मानला जाणारा प्रकल्प सध्या निधीअभावी रखडल्याचे चित्र आहे. केंद्र व राज्य शासनाकडून तत्त्वतः मान्यता मिळूनही प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद अद्याप झालेली नाही. मात्र, कोणत्याही क्षणी सुमारे सहा हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होऊ शकतो, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे.



पुरंदर तालुक्यातील पारगाव, कुंभारवळण, एकहतपूर आदी गावांच्या परिसरात हा विमानतळ उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पुणे शहरातील वाढती लोकसंख्या, उद्योगधंद्यांचा विस्तार तसेच विद्यमान लोहगाव विमानतळ यावरील वाढता ताण लक्षात घेता नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळाची गरज अधोरेखित झाली आहे. मात्र निधीअभावी प्रकल्पाची गती मंदावली आहे.

राज्य शासनाने जमीन संपादनाची प्रक्रिया सुरू केली असली तरी शेतकऱ्यांना योग्य मोबदला, पुनर्वसन आणि इतर सुविधांबाबत अद्याप समाधानकारक तोडगा निघालेला नाही. त्यामुळे जमीन संपादन प्रक्रियेलाही विलंब होत आहे. याशिवाय पर्यावरणीय परवानग्या, तांत्रिक अहवाल आणि केंद्र शासनाकडून अंतिम मंजुरी या टप्प्यांमध्येही प्रक्रिया सुरू आहे. उद्योग क्षेत्राकडून या प्रकल्पाकडे मोठ्या अपेक्षेने पाहिले जात आहे. पुणे हे आयटी, ऑटोमोबाईल आणि स्टार्टअप क्षेत्राचे महत्त्वाचे केंद्र बनत असताना आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ उभारणे आवश्यक मानले जात आहे. विमानतळ सुरू झाल्यास गुंतवणूक वाढ, उद्योगांना चालना आणि मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून देऊन कामाला तातडीने गती द्यावी, अशी मागणी लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून केली जात आहे. आगामी अर्थसंकल्पात या प्रकल्पासाठी विशेष तरतूद होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सांगितले की, पुरंदर विमानतळासाठी आवश्यक निधी देण्यास बँकेने तयारी दर्शवली आहे. प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण होताच कोणत्याही क्षणी निधी उपलब्ध होऊ शकतो. निधी मिळताच शेतकऱ्यांसाठी भरपाई पॅकेज जाहीर करून पुढील प्रक्रिया तातडीने सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# आंबेगाव तालुका येथे गव्हाची मळणी वेगात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुका येथे सध्या रब्बी हंगामातील गव्हाची मळणी वेगात सुरू असून शेतांमध्ये धान्य वेचण्याबरोबरच गव्हाचे काड गोळा करण्याचे काम मोठ्या प्रमाणावर सुरू झाले आहे. तालुक्यात निर्माण झालेल्या चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर गव्हाचे काड जनावरांसाठी मोठा आधार ठरत आहे. त्यामुळे शेतकरी गव्हाचे काड साठवून ठेवताना दिसत आहेत.

अनेक शेतकरी भुसा, कांडी व इतर खाद्यांबरोबर गव्हाचे काड मिसळून जनावरांना देत आहेत. यामुळे जनावरांना पौष्टिक चारा मिळत असून दुधाळ जनावरांच्या दुधोत्पादनातही वाढ होत असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

चांडोली खुर्द येथील तरुण शेतकरी राहुल इंदोरी यांनी सांगितले की, गव्हाची मळणी झाल्यानंतर गव्हाचे काड वेगळे गोळा करून साठवले जाते आणि ते वर्षभर जनावरांच्या चाऱ्यासाठी उपयोगी पडते. भुसा व अन्य खाद्यासोबत गव्हाचे काड मिसळल्याने जनावरांची भूक चांगली भागते तसेच दुधोत्पादनात वाढ होत असल्याचे त्यांनी सांगितले. सध्या चारा टंचाई असल्याने गव्हाचे काड हा सर्वात मोठा पर्याय ठरत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

## सारांश वृत्त

### लष्करप्रमुख ओडिशा दौऱ्यावर

**भुवनेश्वर:** लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी शुक्रवारी दुपारी ओडिशाच्या तीन दिवसीय अधिकृत दौऱ्यावर येथे दाखल झाले. विमानतळावर उतरल्यानंतर लगेचच जनरल द्विवेदी शहरातील १२० इन्फंट्री बटालियन (टीए) कडे रवाना झाले, जिथे ते लष्करी अधिकाऱ्यांशी संवाद साधणार होते आणि रात्र घालवणार होते. कार्यक्रमानुसार, लष्करप्रमुख शनिवारी पुरीला भेट देतील, जिथे ते सैनिक सदनात जाऊन जगन्नाथ मंदिरात प्रार्थना करतील आणि त्यानंतर गंजम जिल्ह्यातील गोपालपूरकडे रवाना होतील.

### झारखंडमध्ये वादळी पावसाची शक्यता

**रांची** : पुढील दोन दिवसांत झारखंडच्या बहुतांश भागांमध्ये हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे, असे भारतीय हवामान विभागाच्या एका अधिकाऱ्याने शुक्रवारी सांगितले. हवामान खात्याने शनिवारी होणाऱ्या मेघगर्जनेसह पावसासाठी 'यलो' अलर्ट (अद्ययावत रहा) देखील जारी केला आहे. भारतीय हवामान विभागाने सांगितले की, गढवा, पलामू, चत्रा आणि लातेहार हे जिल्हे वगळता, शनिवारी राज्याच्या बहुतांश भागात ताशी ४०-५० किमी वेगाने वाहणाऱ्या सोसाट्याच्या वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस, मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि गारपिटीची शक्यता आहे.

### केरळमध्ये लैंगिक अत्याचाराचा आरोप

**पालक्काड (केरळ)** : येथील एका काँग्रेस नगरसेवकाने लैंगिक छळ केल्याचा आरोप करत एका महिलेने केरळचे मुख्यमंत्री पिनारयी विजयन आणि पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे, असे अधिकाऱ्यांनी शुक्रवारी सांगितले. अनुसूचित जमाती समुदायाच्या तक्रारदाराने पालक्काड नगरपालिकेच्या २४ व्या प्रभागातील काँग्रेसचे नगरसेवक प्रशोब सी. वलसन यांच्यावर लैंगिक अत्याचाराचे आरोप केले आहेत. ती ब्युटिशियन म्हणून काम करत होती आणि सामायिक निवासस्थानात राहत होती.

## अर्थव्यवस्थेला दिलासा देण्यासाठी सरकारचे प्रयत्न

# पेट्रोल-डिझेलच्या उत्पादन शुल्कात कपात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : जागतिक कच्च्या तेलाच्या किमती नव्या उच्चांकाकडे वेगाने जात असताना केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात मोठी कपात करून अर्थव्यवस्थेला दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र या कपातीचा थेट फायदा पेट्रोल पंपावरील दरांमध्ये तात्काळ दिसेलच असे नाही, अशी स्थिती आहे.

केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्क प्रत्येकी प्रति लिटर १० रुपयांनी कमी केले असून पेट्रोलवरील उत्पादन शुल्क ३ रुपये प्रति लिटर आणि डिझेलवरील उत्पादन शुल्क शून्य करण्यात आले आहे. जागतिक तेलदरवाढ, पश्चिम आशियातील तणाव आणि पुरवठ्यातील अडथळे यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले जात आहे.




केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी दिलेल्या माहितीनुसार, आंतरराष्ट्रीय कच्च्या तेलाच्या किमती एका महिन्यात प्रति बॅरल सुमारे ७० डॉलरवरून १२२ डॉलरपर्यंत वाढल्या आहेत. यामुळे जगभरातील इंधन दर वाढले असून अनेक देशांमध्ये २० ते ५० टक्क्यांपर्यंत दरवाढ झाली आहे. याउलट भारतात इंधन दर तात्काळ वाढवण्यात आले नाहीत. सरकारने उत्पादन शुल्क कमी करून तेल विपणन कंपन्यांवरील आर्थिक ताण कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. सध्या तेल विपणन कंपन्यांना पेट्रोल किंवा डिझेल विक्रीत प्रति लिटर मोठा तोटा सहन करावा लागत असल्याचे सांगितले जाते.

दरम्यान, जागतिक परिस्थितीचा परिणाम शेअर बाजारावरही दिसून आला. दलाल स्ट्रीटवर मोठी घसरण झाली असून सेन्सेक्स आणि निफ्टी निर्देशांकात मोठी घट नोंदवण्यात आली. जागतिक अनिश्चितता, तेलदरवाढ आणि महागाई वाढण्याची शक्यता यामुळे गुंतवणूकदार सावध झाले आहेत. तसेच रोख्यांच्या परताव्यातही वाढ झाली असून महागाई वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यामुळे व्याजदर कपातीबाबतची शक्यता कमी होत असल्याचे आर्थिक तज्ज्ञांचे मत आहे. पुढील महिन्यात होणाऱ्या बैठकीत रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व्याजदरांबाबत महत्त्वाचा निर्णय घेण्याची शक्यता आहे. भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी सुमारे ८८ टक्के तेल आयात करतो. त्यामुळे जागतिक दरवाढ, डॉलरच्या तुलनेत रुपयाचे अवमूल्यन आणि वाहतूक खर्च यांचा थेट परिणाम देशांतर्गत इंधन दरांवर होतो. तज्ज्ञांच्या मते, उत्पादन शुल्क कपातीमुळे सरकारच्या महसुलावर मोठा ताण येणार असून वार्षिक आर्थिक फटका अंदाजे १.५ ते १.६ लाख कोटी रुपयांपर्यंत जाऊ शकतो. तसेच तेल कंपन्यांनाही काही प्रमाणात तोटा सहन करावा लागणार आहे.

दरम्यान, डिझेल आणि विमान इंधनाच्या निर्यातीवर कर लावून देशांतर्गत पुरवठा कायम ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी या उपायांमुळे देशांतर्गत इंधन उपलब्धता कायम राहील, असे सांगितले आहे. आता जागतिक तेल किमती पुढील काही महिन्यांत कशा राहतात यावर भारतातील इंधन दर, महागाई आणि व्याजदर धोरण मोठ्या प्रमाणात अवलंबून राहणार असल्याचे आर्थिक क्षेत्रातून सांगितले जात आहे.

## ग्राहकांना तात्काळ फायदा नाही; काँग्रेसची टीका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात केंद्र सरकारने केलेली कपात ग्राहक किंवा डीलर्सना तात्काळ दिलासा देणार नाही, असा दावा काँग्रेस पक्षाने शुक्रवारी केला. हा लाभ मोठ्या प्रमाणात केवळ नाममात्र असल्याची टीकाही पक्षाने केली आहे.

केंद्र सरकारने पेट्रोलवरील उत्पादन शुल्क प्रति लिटर ३ रुपयांपर्यंत कमी केले असून डिझेलवरील शुल्क पूर्णपणे काढून टाकले आहे. मात्र, या निर्णयाचा किरकोळ इंधन दरांवर तात्काळ परिणाम होणार नाही, असा युक्तिवाद काँग्रेसने केला आहे. काँग्रेसचे संचार प्रभारी सरचिटणीस जयराम रमेश म्हणाले की, गेल्या १२ वर्षांत सात वेगवेगळ्या प्रसंगी जागतिक कच्च्या तेलाच्या किमती घसरल्या, तरी भारतातील ग्राहकांना त्याचा फायदा मिळाला नाही. आजची उत्पादन शुल्क कपात ही आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला.



दरम्यान, पक्षाचे माध्यम व प्रसिद्धी विभाग प्रमुख पवन खेरा यांनीही सरकारच्या निर्णयावर टीका केली. पेट्रोल आणि डिझेलच्या किमती कमी होत असल्याच्या बातम्या वाचून लोकांना दिलासा मिळाल्याचा गैरसमज होऊ शकतो, मात्र प्रत्यक्षात ग्राहक आणि डीलर्ससाठी किमती पूर्वीप्रमाणेच असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या मते, सरकारने प्रत्यक्षात 'विशेष अतिरिक्त उत्पादन शुल्क' कमी केले आहे, जो तेल विपणन कंपन्यांकडून सरकारला दिला जाणारा कर आहे. तणाव वाढल्यापासून सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यांना तोटा सहन करावा लागत असून, त्या भाराचा एक छोटासा भाग सरकारने उचलण्यास उशिराने सहमती दर्शवली, अशी टीकाही त्यांनी केली.

## ...तर लिव्ह इन रिलेशनशिप गुन्हा नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**प्रयागराज** : अलाहाबाद उच्च न्यायालय यांनी विवाहित पुरुषाने एका सज्ञान महिलेसोबत लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणे हा गुन्हा ठरत नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले आहे. सामाजिक नैतिकता ही न्यायालयाच्या नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करण्याच्या कर्तव्यावर वरचढ ठरू शकत नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

सुनावणीदरम्यान महिलेच्या कुटुंबीयांच्या वकिलांनी संबंधित पुरुष आधीच विवाहित असून तो दुसऱ्या महिलेसोबत राहत असल्याने हा गुन्हा ठरतो, असा युक्तिवाद केला होता. मात्र न्यायालयाने हा युक्तिवाद फेटाळून लावला. सामाजिक नैतिकता आणि कायदा या दोन वेगळ्या गोष्टी असून त्यांची सरमिसळ करता येणार नाही, असे न्यायालयाने नमूद केले.

न्यायालयाने निरीक्षण नोंदवताना म्हटले की, दोन सज्ञान व्यक्ती परस्पर संमतीने लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहत असतील तर त्यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करता येणार नाही. कायद्याच्या दृष्टीने गुन्हा घडलेला नसताना केवळ सामाजिक मत किंवा नैतिकतेच्या आधारावर न्यायालय कारवाई करू शकत नाही. उत्तर प्रदेशातील सहारनपूर येथील एका जोडप्याने त्यांच्या विरोधात दाखल तक्रार रद्द करावी यासाठी न्यायालयात याचिका दाखल केली होती. संबंधित महिला सज्ञान असून ती स्वतःच्या इच्छेने संबंधित पुरुषासोबत राहत असल्याचे तिने पोलिसांना सांगितले होते, याकडेही न्यायालयाने लक्ष वेधले.

या प्रकरणात महिलेच्या कुटुंबीयांनी या संबंधाला विरोध करून धमक्या दिल्याचा आरोप करण्यात आला होता. जोडप्याने ऑनर किलिंगची भीती व्यक्त केली होती. याबाबत न्यायालयाने पोलिसांनी अशा प्रकरणांमध्ये सज्ञान व्यक्तींच्या सुरक्षेची जबाबदारी घ्यावी, असे निर्देश दिले.

## सरकारने लॉकडाऊनच्या अफवा फेटाळल्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : देशभरात लॉकडाऊन लागू होणार असल्याच्या अफवांना केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी ठाम शब्दांत फेटाळून लावले आहे. "असा कोणताही प्रस्ताव सरकारसमोर नाही," असे स्पष्ट करत त्यांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवता संयम बाळगण्याचे आवाहन केले.

पश्चिम आशियातील तणावपूर्ण परिस्थिती आणि जागतिक ऊर्जा पुरवठ्यातील व्यत्ययाच्या पार्श्वभूमीवर काही ठिकाणी लॉकडाऊनबाबत चर्चा रंगू लागली होती. मात्र, पुरी यांनी स्पष्ट केले की, सरकार परिस्थितीवर रिअल-टाइम लक्ष ठेवून असून इंधन, ऊर्जा आणि जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा अबाधित राहील यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना केल्या जात आहेत. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारने अशा जागतिक संकटांमध्येही लवचिकता दाखवली असल्याचा उल्लेख करत, पुढेही "वेळेवर आणि समन्वित पद्धतीने" निर्णय घेतले जातील, असा विश्वास पुरी यांनी व्यक्त केला.




दरम्यान, जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाली असून, काही आठवड्यांतच त्या प्रति बॅरल सुमारे ७० डॉलरवरून १२२ डॉलरपर्यंत पोहोचल्या आहेत. या वाढीचा परिणाम जगभरातील इंधनदरांवर झाला असून, अनेक देशांमध्ये २० ते ५० टक्क्यांपर्यंत दरवाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर देशांतर्गत पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी केंद्र सरकारने काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. यात पेट्रोलियम उत्पादनांवर निर्यात शुल्क लागू करणे, तसेच पेट्रोल व डिझेलवरील उत्पादन शुल्कात कपात करणे यांचा समावेश आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी पेट्रोल व डिझेलवरील उत्पादन शुल्कात कपात जाहीर करून नागरिकांना दिलासा दिला आहे.

## व्यावसायिक एलपीजी वाटपात ७० टक्क्यांपर्यंत वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षामुळे इंधन पुरवठ्यावर परिणाम झाल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने व्यावसायिक एलपीजी वाटप वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारने शुक्रवारी व्यावसायिक एलपीजीचे वाटप पूर्वीच्या ५० टक्क्यांवरून ७० टक्क्यांपर्यंत वाढवले असून त्यामुळे उद्योग क्षेत्राला मोठा दिलासा मिळणार आहे.

केंद्र सरकारने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या सर्व मुख्य सचिवांना याबाबत आदेश जारी केले आहेत. अतिरिक्त एलपीजी वाटप प्रामुख्याने पोलाद, ऑटोमोबाईल, वस्त्रोद्योग, रंगाई, रसायने आणि प्लास्टिक उद्योगांना दिले जाणार आहे. ही क्षेत्रे श्रमप्रधान असून इतर अनेक अत्यावश्यक उद्योगांना आधार देतात, त्यामुळे त्यांना प्राधान्य देण्यात येणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. विशेषतः प्रक्रिया उद्योग तसेच ज्या उद्योगांमध्ये विशिष्ट उष्णता प्रक्रियेसाठी एलपीजी आवश्यक आहे आणि ज्यांना नैसर्गिक वायूचा पर्याय उपलब्ध नाही, अशा उद्योगांना प्राधान्याने एलपीजी पुरवठा करण्यात येणार आहे.

पश्चिम आशियातील संघर्षामुळे एलपीजी आणि एलएनजीच्या पुरवठ्यावर परिणाम झाल्याने देशातील ३३ कोटी घरगुती एलपीजी ग्राहकांवर परिणाम होऊ नये म्हणून यापूर्वी व्यावसायिक एलपीजी पुरवठा कमी करण्यात आला होता. सुरुवातीला व्यावसायिक वापरकर्त्यांना त्यांच्या सरासरी मासिक गरजेच्या केवळ २० टक्के वाटप करण्यात आले होते. तसेच एलपीजीवरून पीएनजी वापराकडे वळणाऱ्या राज्यांना अतिरिक्त १० टक्के वाटप देण्यात आले होते. त्यानंतर पेट्रोलियम मंत्रालयाने आणखी २० टक्के अतिरिक्त वाटपास मंजुरी देण्यात आली आहे.

## कोळसा खाण वाटप प्रकरण

# विजय दर्डा यांची निर्दोष मुक्तता




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : कोळसा खाण वाटपाशी संबंधित फसवणूक आणि गुन्हेगारी कटाच्या प्रकरणात विशेष न्यायालयाने माजी खासदार विजय दर्डा, त्यांचे पुत्र देवेंद्र दर्डा आणि माजी कोळसा सचिव एच. सी. गुप्ता यांची शुक्रवारी निर्दोष मुक्तता केली. आरोपांना पुष्टी देणारा कोणताही ठोस पुरावा आढळला नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

विशेष सीबीआय न्यायाधीश सुनेना शर्मा यांनी या प्रकरणात मनोज कुमार जयस्वाल तसेच मेसर्स एएमआर आयर्न अँड स्टील प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचीही निर्दोष मुक्तता केली. दशकाहून अधिक काळ चाललेल्या या हाय-प्रोफाईल खटल्याचा यामुळे शेवट झाला.

केंद्रीय अन्वेषण विभागाने कथित कोळसा घोटाळ्याप्रकरणी ५० हून अधिक गुन्हे दाखल केले असून महाराष्ट्रातील बांदर येथील कोळसा खाण वाटपासंदर्भातील हे प्रकरण पहिल्या आरोपपत्रातून उद्भवले होते. सीबीआयच्या म्हणण्यानुसार, एएमआर आयर्न अँड स्टील प्रायव्हेट लिमिटेडने कोळसा खाण वाटप मिळवण्यासाठी केंद्रीय कोळसा मंत्रालयाकडे केलेल्या अर्जात खोटी माहिती दिली होती आणि त्यासाठी अधिकाऱ्यांसोबत संगनमत करण्यात आले होते. तसेच त्यावेळी राज्यसभेचे खासदार असलेल्या विजय दर्डा यांनी पंतप्रधान कार्यालयाला पत्रे लिहून कंपनीच्या बाजूने शिफारस केल्याचा आरोप होता. मात्र, न्यायालयाने हे सर्व आरोप फेटाळून लावताना म्हटले की, वाटप प्रक्रियेदरम्यान संबंधित माहिती अधिकाऱ्यांकडे आधीच उपलब्ध होती आणि कोणत्याही साक्षीदाराने फसवणूक किंवा प्रलोभनाच्या आरोपांना दुजोरा दिलेला नाही.

न्यायालयाने निकालात नमूद केले की, फिर्यादी पक्ष फसवणूक, गुन्हेगारी कट किंवा गैरवर्तनाचे आरोप सिद्ध करण्यात अपयशी ठरला. सादर केलेल्या पुराव्यांमध्ये अर्जात खोटी माहिती दिल्याचा किंवा अप्रामाणिक हेतू असल्याचा कोणताही पुरावा आढळला नाही. तसेच कथित २४.६ कोटी रुपयांचे व्यवहार सिद्ध झाले नाहीत आणि या व्यवहारांचा कोळसा खाण वाटप किंवा विजय दर्डा यांनी लिहिलेल्या पत्रांशी कोणताही संबंध असल्याचेही सिद्ध झाले नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. त्यामुळे सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली.

## दरवर्षी २०,००० मुलांच्या होताहेत आत्महत्या...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : डेरेक ओ'ब्रायन यांनी शुक्रवारी राज्यसभा मध्ये मुलांमध्ये आणि तरुणांमध्ये वाढणाऱ्या डिजिटल व्यसनाच्या समस्येबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली. या समस्येमुळे दरवर्षी अंदाजे २०,००० मुले आत्महत्या करतात, असा इशाराही त्यांनी दिला आणि सरकारने या संकटावर तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी केली.

वरिष्ठ सभागृहातील शून्य प्रहरादरम्यान हा मुद्दा उपस्थित करताना ओ'ब्रायन म्हणाले की, विविध अभ्यासांनुसार मुले आणि तरुण दररोज सुमारे आठ तास स्क्रीन आणि मोबाईल फोनवर घालवतात, जे वर्षभरात १०० दिवसांपेक्षा जास्त वेळ ठरतो. त्यांनी नमूद केले की ६८ देशांनी शाळांमध्ये मोबाईल फोनवर आधीच बंदी घातली आहे.

अति स्क्रीन टाइममुळे झोपेचे चक्र बिघडते, चिंता वाढते आणि मनःस्थितीत चढ-उतार होतात, असे त्यांनी सांगितले. स्क्रीन वापरामुळे मेंदूमध्ये डोपामाइन ची पातळी अचानक वाढते, ज्यामुळे मेंदूला जलद बक्षिसाचा संकेत मिळतो आणि तेच वर्तन पुन्हा करण्याची प्रवृत्ती वाढते. यामुळे डिजिटल व्यसन निर्माण होते, असे त्यांनी स्पष्ट केले. इन्स्टाग्राम प्रमुखांचे मत आहे की लोकांना सोशल मीडियाचे गंभीर व्यसन लागू शकते, यावर त्यांचा विश्वास नाही, असेही त्यांनी नमूद केले.

ओ'ब्रायन यांनी व्यक्तींसाठी काही व्यावहारिक सूचना दिल्या. फोन हातात घेण्यापूर्वी स्वतःला 'का?' असा प्रश्न विचारणे, फोन उचलण्यापूर्वी दहापर्यंत मोजणे, उपकरणे वेगळ्या खोलीत चार्ज करणे, झोपण्यापूर्वी किमान दोन तास स्क्रीन टाळणे आणि ठराविक कालावधीसाठी स्क्रीन न वापरण्याचा सराव करणे, अशा उपायांचा त्यांनी उल्लेख केला.

सरकारसाठी त्यांनी तीन प्रमुख शिफारसी मांडल्या. यात सजग वापरास प्रोत्साहन देणे, ऑफलाइन उपक्रमांना चालना देणे आणि युवकांच्या मानसिक आरोग्य व डिजिटल कल्याणाविषयी व्यापक राष्ट्रीय चर्चा सुरू करणे यांचा समावेश आहे. डिजिटल व्यसनाचा मुद्दा गांभीर्याने घेऊन युवकांच्या मानसिक आरोग्याकडे एकत्रितपणे लक्ष देण्याचे आवाहन त्यांनी सरकारला केले.

## श्रीराम मंदिरात मोदींची हजेरी

**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी रामनवमीनिमित्त अयोध्येतील राम मंदिरात आयोजित 'सूर्य तिलक' सोहळ्याला आभासी पद्धतीने हजेरी लावली. हा सोहळा धार्मिक उत्साहात साजरा झाला आणि त्यासाठी लाखो भाविकांनी या पवित्र शहरात गर्दी केली होती. "आज सकाळी अयोध्येतील श्री राम जन्मभूमी मंदिरात झालेल्या सूर्य टिळक सोहळ्याचे साक्षीदार झालो. प्रभू श्री रामांचा आशीर्वाद आपल्यावर सदैव राहो," असे मोदींनी 'एक्स' वरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे.

## सोनिया गांधींच्या प्रकृतीत सुधारणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : सोनिया गांधी यांच्या प्रकृतीत सातत्याने सुधारणा होत असून, त्यांना एक ते दोन दिवसांत रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात येण्याची शक्यता असल्याची माहिती डॉक्टरांनी शुक्रवारी दिली. ताप आल्यामुळे ७९ वर्षीय सोनिया गांधी यांना मंगळवारी रात्री सुमारे १०:२२ वाजता सर गंगा राम रुग्णालय येथे दाखल करण्यात आले होते.

रुग्णालयाचे अध्यक्ष अजय स्वरूप यांनी सांगितले की, गांधी यांच्या प्रकृतीत लक्षणीय सुधारणा झाली आहे. त्या आता चालत फिरत असून त्यांनी नाश्ताही केला आहे. एकंदरीत त्यांची प्रकृती सुधारत असून लवकरच त्यांना घरी सोडण्यात येईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.



डॉक्टरांच्या माहितीनुसार, त्यांच्या शरीरातील संसर्गावर उपचार सुरू असून त्या प्रतिजैविकांना चांगला प्रतिसाद देत आहेत. वरिष्ठ डॉक्टरांचे पथक त्यांच्या प्रकृतीवर सातत्याने लक्ष ठेवून आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, त्यांची प्रकृती स्थिर असून गंभीर नसली तरी खबरदारीचा उपाय म्हणून काही काळ निरीक्षणाखाली ठेवले जाणार आहे.

## निष्कासन नोटीसवर सहा महिन्यांची मुदत वाढीची शक्यता

# २४ अकबर रोड प्रकरणात काँग्रेसला दिलासा?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : काँग्रेस पक्षाला २४, अकबर रोड येथील मुख्यालय रिकामे करण्याच्या नोटीसीतून शेवटच्या क्षणी दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, केंद्र सरकारसोबत पडद्यामागे झालेल्या चर्चेनंतर पक्षाला तात्पुरती सहा महिन्यांची मुदतवाढ मिळू शकते.
२४ अकबर रोड येथील मुख्यालय पक्षाने मागील वर्षी १५ जानेवारी रोजी इंदिरा भवन येथे स्थलांतर केल्यानंतरही वापरात ठेवले होते. त्यानंतर इस्टेट संचालनालय यांनी २८ मार्चपर्यंत जागा रिकामी करण्याची नोटीस बजावली होती. या नोटीसमध्ये ५ रायसीना रोड येथील इंडियन यूथ काँग्रेस कार्यालयाचाही समावेश आहे. सूत्रांनुसार, वरिष्ठ नेते अशोक गेहलोत आणि अजय माकन यांनी सरकारी प्रतिनिधींशी चर्चा करून तात्पुरता तोडगा काढण्याचा प्रयत्न केला. यानुसार, पक्षाला पुढील सहा महिने विद्यमान कार्यालय वापरण्याची परवानगी मिळू शकते. ल्युटियन्स झोनमधील शासकीय निवासस्थानांसाठी पात्र असलेल्या चरणजीत सिंग चन्नी, दिग्विजय सिंग आणि कमलनाथ यांसारख्या वरिष्ठ नेत्यांसाठी पर्यायी जागांचा शोध सुरू असल्याचेही समजते.



अंतरिम व्यवस्था म्हणून अशा निवासस्थानांमधून पक्षाचे कामकाज चालवण्याचा पर्याय विचाराधीन आहे. या प्रकरणी कायदेशीर लढाही सुरूच राहणार असून अभिषेक मनु सिंघवी यांच्या नेतृत्वाखालील पथक निष्कासन आदेशाचा अभ्यास करत आहे. नियमांनुसार, राजकीय पक्षांना ल्युटियन्स बंगला झोनमध्ये एकापेक्षा अधिक शासकीय मालमत्ता ठेवण्याची परवानगी नसते. कायमस्वरूपी कार्यालय मिळाल्यानंतर जुन्या जागा रिकाम्या करणे बंधनकारक आहे. इतिहासाच्या दृष्टीने पाहता, १९७७ च्या लोकसभा निवडणुकीनंतर या बंगल्याचे रूपांतर पक्षाच्या मुख्यालयात करण्यात आले होते. लॉर्ड लिनलिथगो यांच्या काळात ही मालमत्ता ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या ताब्यात होती, ज्यामुळे या इमारतीला ऐतिहासिक महत्त्वही लाभले आहे.